दै. गोदातीर दि. 11.02.25

# नांदेड पोलिसांकडून मासरेड; ६६ गुन्हे दाखल करून सव्वासहा लाखांचा मुद्देमाल जप्त

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची माहिती





**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी, मटका जुगार, कोप्टा कायद्यांतर्गत समूळ उच्चाटन करण्यासाठी मास रेड करून ७९ जणांवर ६६ गुन्हे दाखल करण्यात आले. जिल्हाभरातून सहा लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून ठाणेदारांनी जप्त केला.

नांदेड जिल्ह्यातील अवैध व्यवसाय पुर्णतः बंद करण्यासंबंधाने ऑपरेश फ्लश ऑऊट अंतर्गत जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी, मटका जुगार, कोप्टा कायदा अंतर्गत समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी रविवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी मास रेड घेतली. जिल्हाभरातील सर्व ३६ पोलीस ठाणे अंतर्गत मास रेड करून गुन्हेगारांविरुद्ध गुन्हें दाखल केले. एवढेच नाही तंर दारू, हातभट्टी असा सव्वासहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या मोहिमेत अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे, सुरज गुरव यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधीकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला होता.